**नि.दि.दा.क्र.८८/२०१७**
**दत्तात्रय वि. मारुती व इतर**
**नि. क्र. ५० पुढे सुरु**

नि.क्र.८४ वरील आदेशानुसार साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरु
**<u>प्रतिवादी क्र.१ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री यु.एच.सणस</u>**

१५. मला मारुती रामा गार्डे यांची जन्मतारीख सांगता येणार नाही. मी प्रस्तुत प्रकरणाचे कामकाज चालु असताना त्यांची जन्तारीख शोधण्याची तसदी घेतली नाही. मारुती गार्डे इयत्ता चौथीपर्यंत शिकले होते. तसे कागदपत्र मी दाखल करु शकणार नाही. मारुती गार्डे हे मुंबईहुन सन १९८७ साली गावी आले होते. मुंबईला ते अंबिका सेल या कापड मिलमध्ये कामाला होते तसेच ते टेलरिंगचे देखील काम करीत होते. हे म्हणणे खरे आह की बावधन येथे आल्यानंतर सुध्दा ते टेलरिंगचे काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की मारुती गार्डे यांचे व आमच्या कुटुंबाचे म्हणजे माझ्या वडीलांचे एक रेशनकार्ड नव्हते. हे म्हणणे खरे आहे की मारुती गार्डे यांची पत्नी खाशीबाई व मुलगी मंगल यांचे मारुती यांच्या मृत्यूसमीयपर्यंत एकत्रच रेशनकार्ड होते.

१६. मी स्वतः पांढरेचीवाडी येथे राहायला आहे व त्याच ठिकाणी मतदारयादीत माझे नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की मारुती गार्डे यांचे नाव पांढरेची वाडी येथील मतदार यादीत नसुन बावधन येथील मतदार यादीत आहे. हे म्हणणे खरे आहे की मतदार यादीत मतदाराच्या नावापुढे त्याचा पत्ता व घर नंबर नमुद असतो. हे म्हणणे खरे आहे की बावधन येथील मतदार यादीत मारुती गार्डे यांच्या नावापुढे प्रतिवादी क्र.१ मंगल हिच्या राहत्या घराचा पत्ता नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की मारुती गार्डे यांनी त्यांच्या हयातीत तो पत्ता बदलण्याचा अर्ज केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की मी अथवा माझ्या वडीलांनी मारुती गार्डे यांचे नाव आमच्या रेशनकार्डमध्ये सामील व्हावे या करीता अर्ज दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की मारुती गार्डे आमच्यासह राहायचे हे दर्शविण्याकरीता माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी मंगल हिने मारुती गार्डे यांना तिच्या घरातुन हाकलुन दिल्याचे दर्शविण्याकरता देखील माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की दिलीप उर्फ सतीश गार्डे यांनी त्यांच्यातर्फे साक्ष देण्याबाबत

मला अधिकारपत्र दिलेले नाही. त्यामुळे मी प्रस्तुतचा जबाब माझ्या एकटयाकरीता देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मारुती गार्डे यांचा मृत्यू आजारपणामुळे झाला. सन २००७ साली मारुती गार्डे यांचे वय किती होते हे मला सांगता येणार नाही. मृत्यूसमयी त्यांचे वय किती होते हे सुध्दा मला सांगता येणार नाही.

१७. मी रामचंद्र मारुती दानवले यांचा ओळखतो. माझे त्यांचेशी कोणतेही भांडण नाही. त्यांना लिहिता वाचता येत होते. ते आमच्यातर्फे साक्षीदार म्हणुन प्रस्तुत प्रकरणात आले होते व त्यांनी साक्ष शपथपत्र दिले होते. मी त्यांच्या जबाबाचे शपथपत्र वाचले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यांनी ते शपथपत्र आमच्याशी चर्चा करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यांनी त्यांच्या साक्ष शपथपत्रात मारुती गार्डे हे बाबर हॉस्पीटल येथे सात ते आठ वर्षे अॅडमीट होते असे नमुद केले आहे. त्यांच्या साक्ष शपथपत्रावर आमच्याच विधिज्ञांनी ओळख घातली होती. हे म्हणणे खरे आहे की त्यांचे साक्ष शपथपत्र संगणकीकृत करणे, त्यांची प्रिंट काढणे हे काम आमच्याच विधिज्ञांनी केले होते. हे म्हणणे खरे आहे की ते शपथपत्र खोटे आहे अशी आमचे म्हणणे नाही. हे म्हणणे खरे आहे की त्या शपथपत्रातील काही मजकुर चुकीचा आहे असे म्हटले तर बरोबर होईल.

***न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्याने उर्वरीत उलटतपास तहकुब.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

*स्वाक्षरी/-*

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- ०४/०९/२०२४ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, वाई.